# आयईटी के. के. वाघ एक्स्पोला प्रतिसाद

## विजेत्यांना चार लाखांच्या बक्षिसांचे वितरण

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. २९ : क. का. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेत प्रगत तंत्रज्ञानावर आधारित अविष्कारांच्या आयईटी के. के. वाघ एक्स्पोचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनव संकल्पना मांडत परीक्षकांचे लक्ष वेधले. यातून विजेत्यांना चार लाखांचे बक्षिसे वितरित करण्यात आली.**




**नाशिक :** क. का. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेत आयोजित आयईटी के. के. वाघ एक्स्पो स्पर्धेतील विजेते विद्यार्थी.

पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (ता. २८) झाला. या वेळी फॉक्स सोल्यूशन्स प्रा. लि. चे संचालक जॉय अलूर यांनी विद्यार्थ्यांना संशोधनावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास के. के. वाघ शिक्षण संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, संस्थेचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, प्रकल्प परीक्षक रवींद्र वाडीकर, संदीप कारखानीस, राजेंद्र कोडमलवार, मिलिंद तरे, दिलीप आढाव, ईश्वर परदेशी, विभागप्रमुख डॉ. रवींद्र मुंजे आदी उपस्थित होते. प्रातिनिधिक स्वरूपावर रवींद्र वाडीकर आणि दिलीप आढाव यांनी परीक्षक म्हणून मत व्यक्त केले.

या स्पर्धेत 'गट-अ'मधील एक लाखांचे प्रथम पारितोषिक आर.व्ही. आर. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (गुंटूर, आंध्र प्रदेश) येथील नारा सिंघा साई किरण यांच्या प्रकल्पाला मिळाले. पन्नास हजारांचे द्वितीय पारितोषिक क. का. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेतील आयुष शर्मा, प्रथमेश वाळके, मुनीब शेख आणि पीयूष जगताप यांच्या प्रकल्पाला मिळाले. तृतीय पारितोषिक दोन प्रकल्पांना विभागून दिले. यामध्ये प्रत्येकी साडेबारा हजार एसआयईएस ग्रॅज्युएट स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, नवी मुंबई येथील यश थापर, संस्कृती गोडसे, डिंपल नारखेडे, सोहन राय आणि आयुष टंक यांच्या प्रकल्पास, तसेच चित्कारा युनिव्हर्सिटी, पंजाब येथील अंगदवीर सिंग आणि गुरुकमल सिंग यांच्या प्रकल्पाला मिळाले.

'गट-ब'मधील एक लाखांचे प्रथम पारितोषिक हे आर.व्ही.आर. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (गुंटूर, आंध्र प्रदेश) येथील एम. भानू नागा तेजा, के. साई चैतन्य, अखिल सिया चौधरी आणि पि. शेखर यांच्या नोव्हा मोव्ह प्रकल्पाला मिळाले. पन्नास हजारांचे द्वितीय पारितोषिक संजीवनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील साहिल गोरे, जीवन कोळपे, चैतन्य आहेर, केतन ताटे, प्रेम सूर्यवंशी, सोहम गाडे यांना मिळाले. तृतीय पारितोषिकाचे पंचवीस हजारांचे पारितोषिक क. का. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था येथील शुभम इंगळे, नंदिनी अहिरराव आणि अथर्व चाटे यांच्या प्रकल्पाला मिळाले. के. के. वाघ एक्स्पोमध्ये सुमारे चार लाख रुपये इतक्या रकमेची बक्षिसे विविध श्रेणींमध्ये १५ प्रकल्प गटांना वितरित करण्यात आली. या बक्षिसांसाठी आयईटी नाशिक लोकल नेटवर्क, एमएमएस इंडिया, लॉरिट्झ नुडसेन इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन, पेरुची वाडी, एनजीओ स्माईल अँन्ड स्पिन्याच सेंटर, नाशिक, एएमटी स्किल सेंटर आदी संस्थांनी प्रायोजकत्व दिले होते. शेवटी प्रा. डॉ. रवींद्र मुंजे यांनी पुढील वर्षी घेण्यात येणाऱ्या एक्स्पोची घोषणा केली. आयईटी विद्यार्थी संघटनेची अध्यक्ष हर्षदा चावंडे हिने आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव के. एस. बंदी यांनी स्पर्धकांचे अभिनंदन केले.

# पवार वैद्यकीय महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन 'अरोरा'

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २९ : मविप्र संस्थेच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्राच्या प्रांगणात वार्षिक स्नेहसंमेलन 'अरोरा २०२६' उत्साहात पार पडला. या वेळी एमबीबीएस बॅच-२०२२ च्या विद्यार्थ्यांनी सोहळ्याच्या माध्यमातून कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाप्रसंगी मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, की मविप्र [illegible] महाविद्यालयाची शैक्षणिक



**नाशिक :** वार्षिक स्नेहसंमेलन 'अरोरा-२०२६'प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे.

गुणवत्तेसोबत सर्वांगीण विकासही केले. सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष

# कटू अनुभवांवर पु

## माजी आमदार बोरस्ते : ढिकले

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २९ : दोन भिन्न शैलीतील पुस्तके चिंतनशीलता आणि प्रतिभेचा प्रत्यय देणारी दोन टोक आहेत. त्यामध्ये शेतीमाती आणि नात्यांबरोबर आधुनिक पुरोगामी विचार पेरलेले आहेत. खडतर परिस्थितीतून समृद्ध जीवन आणि समाजातील कटू अनुभवांवर पुस्तकांत भाष्य केले असल्याचे मनोगत माजी आमदार नानासाहेब बोरस्ते यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ लेखक तु. सी. ढिकले यांच्या 'राहिले ते तीर्थ' [illegible]

